# MT

**Seat No.** | | | | | | | |

**2018 .... .... 1100**

**MT - MARATHI (SECOND OR THIRD LANGUAGE) (M) - SEMI PRELIM - I - PAPER - II**

**Time : 3 Hours** **(Pages 11)** **Max. Marks : 100**

---

## विभाग १ – गद्य

**प्र.१ अ. खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

**(१) आकृतिबंध पूर्ण करा.** **2**

| | |
|---|---|
| ताडोबा → | |
| तारीख → | |
| परिक्षेत्र → | |
| वेळ → | |

ता. २७ मे १९९७, वेळ–सकाळी ६ ते ९.३०, कोळसा परिक्षेत्र, ताडोबा–अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर आज पहाटेच कोळसावन विश्रामगृहातून बाहेर पडलो.

गावातून टोंगे वनरक्षक आणि त्यांचा सहकारी वनमजूर येताना दिसले. वनरक्षक येताच आम्ही डावीकडं जाणारा झरी रस्ता धरला. समोर चालणारा वनमजूर अचानक थबकला. मी प्रश्नार्थक नजरेनं पाहिलं, तर त्यानं रस्त्याकडं बोट रोखलं. नुकत्याच गेलेल्या एका मोठ्या बिबळ्याची ताजी पावलं तिथं उमटली होती. हा एक नर असून आम्ही पोहण्याच्या तासाभराआधीच इथून गेला असावा. मी चौफेर पाहिलं; पण मला तरी काही दिसलं नाही.

अचानक मला जंगलाच्या कोपऱ्यावर थोडीशी हालचाल जाणवली. मी सगळ्यांना हातानंच थांबायची खूण केली. दुर्बीण डोळ्यांना लावल्यावर ती हालचाल स्पष्ट झाली. तिथं एका तेंदूच्या झाडाखाली, बांबूमध्ये बिबळा बसला होता; पण त्याचा रंग आसपासच्या परिसराशी एवढा मिसळून गेला होता, की त्याची शेपूट जर हलली नसती, तर तो मला मुळीच दिसला नसता. त्याची पाठ आमच्याकडं होती, त्यामुळे त्यानं अद्याप आम्हाला पाहिलं नव्हतं; पण तेवढ्यात टोंगे वनरक्षकांचा पाय एका वाळक्या काटकीवर पडला आणि 'कट्' असा आवाज झाला. तिखट कानांच्या बिबळ्यानं तो आवाज ऐकताच वळून पाहिलं आणि एकाच झेपेत तो जंगलात अदृश्य झाला.

बिबळ्याच्या निरिक्षणांची चांगली संधी हातची गेली म्हणून मी हळहळलो. टोंगे यांना शरमिंद झाल्यासारखं वाटलं. आम्ही लगेच पुढं निघालो. थोड्याच अंतरावर रायबाकडं जाणारा रस्ता उजवीकडं वळत होता. तो रस्ता धरला आणि जंगल आणखीच दाट झाल्यासारखं वाटलं. इथं दोन-तीन नाले असल्यानं झुडपांची दाटी जास्तच जाणवते. तसंच त्या नाल्यांमध्ये थोडं पाणी साचून राहात असल्यानं तिथं कुठलाही वन्यप्राणी दिसण्याची शक्यता होती. त्यामुळं आता सावधपणे पावलं टाकणं आवश्यक होतं.

(२) (i) **सकारण लिहा.** **1**

बिबळ्यानं अद्याप लेखकाला पाहिलं नव्हतं, कारण –

(अ) लेखक लपून बसला होता. (ब) झुडपांची दाट झाडी होती.

(क) लेखकाकडे त्याची पाठ होती. (ड) बांबूचे बन होते.

(ii) **'बिबळ्याच्या निरीक्षणाची' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.** **1**

(३) **व्याकरण :**

(i) **योग्य उभयान्वयी अव्यय वापरून खालील रिकामी जागा भरा.** **1**

तो रस्ता धरला ............ जंगल आणखीच दाट झाल्यासारखं वाटलं.

(ii) **तक्ता पूर्ण करा.** **1**

| | शब्द | प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|---|
| (i) | डोळ्यांना | ........ | ........ |

(४) **स्वमत :** **2**

तुम्ही अनुभवलेल्या जंगल सफारीचे वर्णन लिहा.

**प्र.१ आ. खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

(१) **आकृतिबंध पूर्ण करा.** **2**




माझ्या बालमित्रांनो, मी तुमच्याएवढा होतो तेव्हा अगदी तुमच्यासारखाच खेळकर, खोडकर व उपद्व्यापी होतो! माझा जन्म पुण्यातच एका गरीब कुटुंबात झाला. माझे वडील त्या वेळेस पोलीसखात्यामध्ये तुटपुंज्या पगारावर नोकरी करत होते. तेव्हा साहजिकच गरीब कुटुंबाच्या वाट्याला येणारे सारे कष्ट व दु:खे आम्ही भोगत होतो. अशा परिस्थितीत वडिलांना आम्हां मुलांसाठी खेळणी विकत घेणे शक्यच नव्हते. दुसऱ्या मुलांच्या हातात खेळणी पाहून आम्हांला त्यांचा हेवा वाटत असे. तरी पण गल्लीतील मुलांना जमा करून उन्हातान्हात विटीदांडू तरी पण गल्लीतील मुलांना जमा करून उन्हातान्हात विटीदांडू खेळणे, पतंग उडवणे, कधीमधी कॅम्पमधील कॅनॉलमध्ये चोरून पोहणे; कैऱ्या, पेरू पाडून त्यांचा यथेच्छ स्वाद घेणे, घरात जळणासाठी आणलेल्या लाकडांतूनच बॅट व स्टंप तयार करणे

व कुठून तरी जुना पुराणा बॉल पैदा करून क्रिकेट खेळणे असा माझा दिवसभराचा कार्यक्रम असायचा. संध्याकाळी घरी येईपर्यंत माझ्याबद्दल बऱ्याच तक्रारी आईच्या कानांवर आलेल्या असायच्या. दिवसभराच्या खेळाने भूक तर खूपच लागलेली असायची. घरात पाऊल ठेवतो न ठेवतो तोच पाठीवर धम्मकलाडू व चापटपोळ्यांचा यथेच्छ वर्षाव व्हायचा. मग मी घरात एका कोपऱ्यात जाऊन रडत बसायचा! तिथेच झोप लागायची आणि जाग यायची ती आईच्या प्रेमळ कुशीत.

नंतर माझ्या वडिलांची बदली वडगावला झाली. त्याचा परिणाम असा झाला, की मला व माझ्या थोरल्या भावाला शाळेसाठी पुण्यातच काकांकडे राहावे लागले. त्या वेळेस मी अवघा नउ-दहा वर्षांचा असेन. त्या लहान वयात आई–वडिलांपासून दूर राहणे माझ्या जिवावर येई. खूप रडायला यायचे; पण त्याचा काही उपयोग व्हायचा नाही. हट्टही करून बघितला, पण व्यर्थ. आम्हांला सोडून जाणे आई-वडिलांच्याही जिवावर आले होते; परंतु मुलाने चांगले शिकावे, मोठा ऑफिसर व्हावे व घराण्याचे नाव उज्ज्वल करावे या उद्देशाने त्यांनी कसेबसे मन घट्ट करून आमचा निरोप घेतला.

(२) **(i) एका वाक्यात उत्तर लिहा.** **1**

वडिलांची बदली कोठे झाली ?

**(ii) कारण लिहा.** **1**

वडिलांना मुलांसाठी खेळणी विकत घेणे शक्य नव्हते.

(३) **व्याकरण :**

**(i) खालील वाक्यातील सर्वनाम ओळखा.** **1**

माझ्या थोरल्या भावाला काकांकडे रहावे लागले.

**(ii) विरुद्धार्थी शब्द लिहा.** **1**

(i) गरीब × [ ] (ii) दु:ख × [ ]

(४) **स्वमत :** **2**

लेखकाच्या आईवडिलांनी मन घट्ट करून का निरोप घेतला असेल ? तुमच्या शब्दांत सांगा.

**अपठित गद्य**

**प्र.१ इ. खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

(१) **आकृतिबंध पूर्ण करा.** **2**



चांगली कामे केली म्हणजे मनुष्य स्वर्गात जातो आणि वाईट कृत्ये केली की तो नरकात जातो, अशी आपल्याकडे पूर्वापार कल्पना आहे. या स्वर्गाच्या आणि नरकाच्या जागा कोठे असाव्यात त्यासंबंधीही काही संकेत सर्वमान्य आहेत. स्वर्ग वर आकाशाच्या पलीकडे कोठेतरी आहे आणि नरक हा खाली पाताळात असावा असे मानले जाते.

हे पत्ते आता बदलले आहेत, याची नोंद घेणे आवश्यक आहे. चांगल्या कृत्यामुळे स्वर्ग मिळतो व वाईट कर्मामुळे नरकात जावे लागते. चांगल्या किंवा वाईट कृतीची बीजे आपल्या विचारात म्हणजे आपल्या मनातच असतात. त्या कृतीचा परिणाम जसा बाह्य जगावर होतो तसा आपल्या मनावरही होतो. मनातील प्रत्येक विचार आणि हातून होणारी एकेक कृती आपल्या मनाला, उन्नतीला किंवा अधोगतीला नेणारी असते. ही क्रांती आपल्या मनातच होत असते. म्हणून आपले मन हेच स्वर्गाचे किंवा नरकाचे स्थान आहे.

सज्जनाचे मन हाच स्वर्ग! दुर्जनाचे मन हाच नरक! हे बदललेले पत्ते लक्षात ठेवून कोठे जायचे हे ज्याचे त्याने ठरवावे.

**(२) उत्तरे लिहा.** **2**

(i) चांगल्या किंवा वाईट कृतीची बीजे कशात असतात?

(ii) आपले मन कशाचे स्थान आहे?

**(३) व्याकरण :**

(i) **समानार्थी शब्द लिहा.** **1**

(अ) हात – [ ] (आ) बीज – [ ]

(ii) **विरुद्धार्थी शब्द लिहा.** **1**

(अ) स्वर्ग × [ ] (आ) अलीकडे × [ ]

**(४) स्वमत :** **2**

स्वर्ग आणि नरक याविषयीचे तुमचे विचार स्पष्ट करा.

## विभाग २ – पद्य

**प्र.२ (अ) खालील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

**(१) आकृतिबंध पूर्ण करा.** **2**

(i) **डोळे भरून पाहायची आहे** → [ ]

(ii) **ज्योत ज्योत पाजळावी** → [ ]

नाही मुठीमध्ये द्रव्य
नाही शिरेमध्ये रक्त,
काय करावें कळेना
नाही कष्टाचे सामर्थ्य;
जीव ओवाळावा तरी
जीव किती हा लहान;
तुझ्या शौर्यगाथेपुढे
त्याची केवढीशी शान;
वर घोंघावे बंबारा,
पुढे कल्लोळ धुराचे,
धडाडत्या तोफांतून
तुझें पाऊल जिद्दीचें;
तुझी विजयाची दौड
डोळे भरून पहावी
डोळ्यांतील आसवांची
ज्योत ज्योत पाजळावी
अशा असंख्य ज्योतींची
तुझ्यामागून राखण;
दीनदुबळ्याचं असें
तुला एकच औक्षण.

(२) (i) **खालील प्रश्नाचे उत्तर एका वाक्यात लिहा.** 1
डोळे भरून पाहावे असे दृश्य कोणते ?

(ii) **कंसातील योग्य शब्द वापरून रिकामी जागा भरा.** 1
तुझ्या शौर्यगाथेपुढे त्याची केवढीशी ..........
(मान, शान, किंमत, हिम्मत)

(३) **कवितेच्या संदर्भात 'दीनदुबळे' याचा कवयित्रीला अभिप्रेत असलेला अर्थ स्पष्ट करा.** 2

(४) **देशसेवा हीच ईश्वरसेवा असे समजून कार्य करणाऱ्या सैनिकासाठी तुम्ही काय करू शकता ते लिहा.** 2

**प्र.२ आ. खालील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

(१) **आकृतिबंध पूर्ण करा.** 1

**नव्या पिढीचे, नव्या युगाचे करू साकार**
↓
[ ]

(२) **चौकट पूर्ण करा.** 1

फुलामुलांतून हसणारा - [ ]

या देशाच्या मातीवरती अमुचा रे अधिकार
नव्या पिढीचे, नव्या युगाचे स्वप्न करू साकार।।

फुलामुलांतून हसतो श्रावण
मातीचे हो मंगल तनमन
चैतन्याचे फिरे सुदर्शन
शेतामधुनी पिकवू मोती, धन हे अपरंपार।।

या हातांनी यंत्र डोलते
श्रमशक्तीचे मंत्र बोलते
उद्योगाचे चक्र चालते
आभाळावर उत्क्रांतीचा घुमवू या ललकार।।

हजार आम्ही एकी बळकट
सर्वांचे हो एकच मनगट
शक्तीचीही झडते नौबत
घराघरांतून जन्म घेतसे तेज नवा अवतार।।

या विश्वाची विभव संपदा
जपू वाढवू आम्ही लाखदा
हस्त शुभंकर हवा एकदा
भविष्य उज्ज्वल या देशाचे करूया जयजयकार।।

(२) (i) **कंसातील योग्य शब्द वापरून रिकामी जागा भरा.** **1**

.......... उत्क्रांतीचा घुमवू या ललकार ।।

(धरतीवर, पाण्यावर, आभाळावर, हवेवर)

(ii) **ओघतक्ता पूर्ण करा.** **1**




(३) **या कवितेत कवीने बघितलेले स्वप्न तुमच्या शब्दांत लिहा.** **2**

(४) **कवितेत व्यक्त झालेला एकात्मतेचा विचार स्पष्ट करा.** **2**

**प्र.२ इ. खालील ओळींचे रसग्रहण करा.** **4**

(१) धान्य देईना संगणक हा, काळी आई जगवू
मातीमध्ये जे हात राबती, तयांस देऊ पुष्टी...
रंग मजेचे, रंग उद्याचे

## विभाग ३ – स्थूलवाचन

**प्र.३. खालील कोणत्याही दोन कृती सोडवा.** **6**

(१) थोड्याशा पाण्यावर कसे वाढावे याचा नमुना म्हणजे कॅक्टस! या विधानाची यथार्थता लिहा.

**(२) खालील मुद्द्यांवर एक परिच्छेद तयार करा.**




**(२) टिपा लिहा.**




## विभाग ४ – भाषाभ्यास

**प्र.४ (अ) भाषाभ्यासावर आधारित कृती**

(i) **समास** **2**

**खालील तक्ता पूर्ण करा.**

| अ.क्र. | सामासिक शब्द | विग्रह | समासाचे नाव |
|---|---|---|---|
| (i) | गल्लोगल्ली | --------------- | --------------- |
| (ii) | मायलेक | --------------- | --------------- |

(ii) **अलंकार** **2**

'यमक' अलंकाराची दोन उदाहरणे द्या.

(iii) **वाक्यरूपांतर** **2**

**कंसातील सूचनेप्रमाणे वाक्य परिवर्तन करून लिहा.**

१. अब्दुल बसस्टॉपवर आला. (आज्ञार्थी करा.)

२. तपोवनाकडे कोण कशाला जातोय ? (विधानार्थी करा.)

(iv) **सामान्यरूप** **2**

**दिलेल्या शब्दांचे मूळशब्द व सामान्यरूप असे वर्गीकरण करा.**

| क्र. | दिलेला शब्द | मूळशब्द | सामान्यरूप |
|---|---|---|---|
| (१) | तुरूंगात | -------- | -------- |
| (२) | समारंभांना | -------- | -------- |

(v) **वाक्प्रचार** **2**

**खालील वाक्प्रचार वाक्यात योग्य ठिकाणी वापरून वाक्ये पुन्हा लिहा.**

(अवहेलना करणे, वर्ज्य करणे, सक्त ताकीद देणे)

१. बाहेर कामाशिवाय जायचे नाही, असे वडिलांनी मला कडक शब्दात समजावले.

२. मुलांनी वाईट पदार्थ सोडून दिले पाहिजेत.

**प्र.४ (ब) स्वाध्यायावर आधारित कृती.**

**(१) शब्दसंपत्ती** **1**

(i) **समानार्थी शब्द लिहा.**

१. आशय - ............ २. परिचय - ............

(ii) **विरुद्धार्थी शब्द लिहा.** **1**

१. नकारार्थी × [ ] २. खासगी × [ ]

(iii) **खालील शब्दसमूहासाठी एक शब्द लिहा.** **1**

जेथे दोन नद्या एकत्र येऊन मिळतात - [ ]

(iv) **एका शब्दाचे भिन्न अर्थ लिहा.** **1**

[ ] ← काळ → [ ]

(२) **लेखननियमांनुसार लेखन**

(i) **अचूक शब्द ओळखून लिहा.** **1**

१. वडीलांसोबत / वडिलांसोबत / वडिलानसोबत /वडिलांसोबत

२. तालमिला / तालमीला / ताल्मीला / ताल्मिला

(ii) **खालील वाक्य लेखननियमानुसार शुद्ध करून लिहा.** **1**

रेखामावशि सगळ्यांचं बोलणं लक्श देऊन ऐकत होत्या.

(३) **विरामचिन्हे**

**खालील वाक्यात योग्य विरामचिन्हांचा वापर करून वाक्ये पुन्हा लिहा.** **2**

१. वा सई ताई दादांनी मला कित्ती माहिती दिली आता हा कोणता दादा बरं.

२. कित्ती सुंदर आता ही ताई कोण बरं

(४) **पारिभाषिक शब्द**

**खालील शब्दांना पारिभाषिक शब्द लिहा.** **1**

१. Footprints - २. Computer -

(५) **भाषिक खेळ**

**खालील शब्द अकारविल्हेनुसार लावा.** **1**

राग, मोह, दंभ, लोभ

## विभाग ५ – उपयोजित लेखन

**प्र.५ अ. खालील कृती सोडवा.**

(१) **पत्रलेखन** **5**



(२) **सारांश लेखन** **5**

**खालील उतारा वाचा व त्याचा एकतृतीयांश एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.**

माणसाचे जीवन म्हणजे विविध प्रकारच्या अनुभवांची साखळी असते. ज्याक्षणी त्याचा जन्म होतो, त्याक्षणीच ह्या साखळीची गुंफण होऊ लागते. हे अनुभव जसे शारीरिक तसेच बौद्धिक आणि भावनिक असतात. असे विविध स्वरूपाचे अनुभव संदर्भातून एकमेकांवर प्रतिक्रिया करत करत संमिश्र होतात आणि त्यांच्या प्रभावाने माणसाचे व्यक्तिमत्त्व घडत असते. काही अनुभव जीवनात साहजिकपणे येतात; पण काही अनुभव आपल्या इच्छेने, आपल्या जिज्ञासेच्या ओढीमुळे घेण्याची प्रवृत्ती माणसात असते. हे सर्व अनुभव माणसाचे एक प्रकारचे सहजशिक्षण करत असतात, त्याच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देत असतात. मात्र हे शिक्षण बरेचसे अव्यवस्थित असते. अनुभवांचा उपयोग जाणीवपूर्वक करून आपले व्यक्तिमत्त्व अधिक समतोल, अधिक संपन्न कसे करावे हे माहित नसेल तर कितीतरी महत्त्वाचे अनुभव वाया जातात. म्हणून, अनुभवांची योग्य पडताळणी करून, योग्य रचना करून, समतोल व्यक्तिमत्त्व घडविण्याची व्यवस्था करणे हे सुसंस्कृत समाजाचे कर्तव्य असते. त्या व्यवस्थेला आपण 'शिक्षणव्यवस्था' म्हणतो.

**प्र.५ आ. खालील कृती सोडवा.**

(१) **बातमी लेखन** **6**

**खालील विषयावर बातमी तयार करा:**

**डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांच्या स्मरणार्थ आयोजित**

**शिक्षक दिन कार्यक्रम**

**स्थळ :** वासुदेव बळवंत फडके विद्यालय, सावंतवाडी

(२) **कथा लेखन** **6**

**खाली दिलेल्या मुद्द्यांवरून कथा तयार करा. कथेला योग्य शीर्षक द्या.**

**मुद्दे :** श्रीमंत म्हातारा - दोन नोकर - कोंबडा आरवला की म्हातारा उठे - नोकरांना उठवून काम करायला सांगे - नोकरांनी विचार करून कोंबड्याला मारणे - म्हाताऱ्याचे वेळी-अवेळी उठणे - नोकरांना उठवणे - नोकरांना पहिल्यापेक्षा जास्त काम - पश्चाताप.

**प्र.५ इ. लेखनकौशल्य**

**खालील लेखनप्रकारांपैकी कोणतीही एक कृती सोडवा.** **8**

(१) **मी पक्षी झालो तर ...**



(२) झाडाचे आत्मवृत्त

१. जन्म - एखाद्या जंगलात

२. रोप असताना जीवन

३. हवा, ऊन, पाऊस यांचा परिणाम, मजा

४. वृक्षांत रूपांतर कसे वाटले

५. पक्षी फळे यांच्यापासून मिळणारा आनंद

६. वृक्षतोडीविषयी मत



७. वृक्ष नसतील तर काय होईल परिणाम

**Best Of Luck**